# महाराष्ट्र विधानपरिषद

## पत्रक भाग दोन

**सोमवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२५ / फाल्गुन ५, १९४६ (शके)**

**१३. महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९७ अन्वये निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर "अल्पकालीन चर्चेच्या सूचना" स्वीकारण्याबाबत.**

१. महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०२५ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चेची सूचना **MOIS या आज्ञावली (WEB PORTAL)** व्दारे संपूर्णत: ऑनलाईन पद्धतीने मंगळवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२५ रोजीपासून सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.

२. महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चेची सूचना सादर करताना संबंधित बाबींवर चर्चा उपस्थित करण्यासंबंधीची कारणे नमूद करणारी स्पष्टीकरणात्मक टिप्पणी सादर करणे तसेच सूचनेच्या पुष्टयर्थ किमान इतर दोन सदस्यांचा ऑनलाईन पाठिंबा घेणे आवश्यक आहे.

३. महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९७ अन्वये द्यावयाच्या सूचनेचा विषय हा निकडीचा, सार्वजनिक महत्वाचा, स्पष्ट, मुद्देसूद असणे आवश्यक आहे.

४. महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९७ अन्वये प्राप्त होणाऱ्या सूचना स्वीकृती संबंधी व स्वीकृत सूचना चर्चेला घेण्यासंबंधीचा संपूर्ण अधिकार मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचाच राहिल.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २४ फेब्रुवारी, २०२५

**जितेंद्र भोळे**
सचिव (१) (कार्यभार)
महाराष्ट्र विधानपरिषद

**प्रती :-**

(१) महाराष्ट्र विधानरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य
(२) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव
(३) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
(४) मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
(५) सचिव (१) (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहायक
(६) सचिव (२) (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहायक
(७) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी
(८) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालय
(९) संगणक कक्ष **(WEBSITE)**